संदर्भ (औविअ) क्र.:— ०३/२०२१. निशाणी क्र.:—यु—४ वर.

उलटतपासणी ॲड. श्री. डी. पी. तोडकर यांचेद्वारा.

१) हे म्हणणे खरे की मला दि. १४/०५/१९८५ रोजी स्वीपर म्हणून नेमणूक दिली. हे म्हणणे खरे की त्यानंतर मला शिपाई पदाचे काम देण्यात आले.

प्रश्न :— तुम्ही २७/०२/२००३ रोजी राजीनामा दिला ?

उत्तर :— माझेकडून राजीनामा जबरदस्तीने घेतला.

२) मी बॅकेविरूध्द् पोलिस ठाण्यात, सरकारी कामगार आयुक्तांकडे किंवा कोणत्याही कोर्टात तक्रार केली नाही. हे म्हणणे खोटे की बॅकेने दि. १०/०३/२००३ च्या पत्राने माझा राजीनामा मंजूर झाल्याचे मला कळविले. हे म्हणणे खोटे की मी प्रॉव्हिडंट फंड व उपदानाची रक्कम मला मिळावी म्हणून दि. ०९/०४/२००३ रोजीचे पत्र बॅकेला दिले. हे म्हणणे खोटे की माझी प्रॉव्हिडंट फंडची रक्कम रू. २,११,८६५/— व उपदानाची रक्कम रू. ८६,१५०/— असल्याचे बॅकेने मला ०९/०४/२००३ च्या पत्राने कळविले. हे म्हणणे खरे की मी बॅकेला दि. १०/०४/२००३ च्या पत्राने माझी सीटीडीची रक्कम माझे कर्ज खात्यामध्ये वर्ग करण्याचे कळविले. त्याप्रमाणे बॅकेने रक्कम वर्ग करून उर्वरीत रक्कम रू. ८८,०९८/— माझे बचत खात्यात दि. ३०/०४/२००३ ला वर्ग केल्याचे मला सांगता येणार नाही. माझ्या राजीनाम्यानंतर बॅकेने माझ्या बचत खात्यात काही रक्कम वर्ग केल्याचे मला आठवत नाही.

३) हे म्हणणे खरे की कामगार न्यायालय, सातारा येथे दाद मागण्यापूर्वी मी माझे राजीनाम्यासंदर्भात इतर कोठेही दाद मागितली नाही. सध्या मी चिपळूण नागरी पतसंस्थेमध्ये वॉचमन म्हणून काम करतो. तेथे मला रू. ६,५००/— पगार आहे.

.....६/—

४) बॅकेच्या अधिका—याने मला त्रास दिल्याची लेखी तक्रार मी बॅकेच्या वरिष्ठांकडे नोकरीत असताना दिली होती. अशा तक्रारीचा पुरावा मी या केसमध्ये हजर केला नाही. हे म्हणणे खोटे की मला बॅकेच्या कोणत्याही अधिका—याने कधीही त्रास दिला नसल्याने मी सदर तक्रार दाखल केली नाही. हे म्हणणे खरे की मी वैद्यकीय अधिका—यांच्या उपचाराखाली असल्याचा पुरावा या केसमध्ये दाखल केला नाही.

५) दि. २७/०३/२००३ रोजी मी बॅकेच्या सेवेत नसल्याचे मला आठवत नाही. माझी को—या कागदावर सही घेतली अशी तक्रार मी बॅकेच्या चेअरमन अथवा सीईओ कडे केली नाही. हे म्हणणे खोटे की मी स्वेच्छेने राजीनामा दिल्याने अशी तक्रार केली नाही. हे म्हणणे खोटे की मी युनियनकडे गेल्याचे खोटे सांगतो. फेब्रुवारी २००३ ते डिसेंबर २०१९ या काळात कामगार आयुक्तांकडे तक्रार करायला मला काही अडचण नव्हती याबाबत मी काही सांगू शकत नाही. हे म्हणणे खोटे की मी रीतसर राजीनामा दिला होता व बॅकेकडून पैसे उकळण्यासाठी दि. ३०/१२/२०१९ रोजी कामगार आयुक्तांकडे खोटी तक्रार केली. बॅकेने कामगार आयुक्तांकडे लेखी म्हणणे दिल्याचे मला माहीत नाही.

६) बॅकेच्या सेवेतून मुक्त झाल्यावर बॅकेने मला सर्व कायदेशीर देणी दिली होती याबाबत मी काही सांगू शकत नाही. बॅकेने हजेरीपत्रक, ओळखपत्र व पगारपत्रक ठेवले नसल्याची तक्रार मी कोणाकडे केली नाही. हे म्हणणे खोटे की माझ्या सरतपासात परिच्छेद १२ मध्ये मी खोटा मजकूर लिहिला आहे.

७) हे म्हणणे खरे की मी बॅकेच्या नोकरीत असताना माझा प्रॉव्हिडंट फंड कापला जात होता व मला बोनस, रजा मिळत होत्या. हे म्हणणे खोटे की मी स्वेच्छेने राजीनामा दिला, तो बॅकेने मंजूर केला, त्यामुळे मी सरतपासात

नमूद कोणत्याही मागणीस पात्र नाही. हे म्हणणे खोटे की मी खोटे शपथपत्र दाखल केले व खोटी साक्ष दिली.

उलटतपास — 'पूर्ण.

फेरतपासणी — नाही.

श्रवणोत्तर स्विकृत / माझेसमोर,

दिनांक :— २२/०८/२०२३.

सातारा.

( अनुश्री रा. राहाणे, )
पिठासीन अधिकारी,
कामगार न्यायालय, सातारा.

*मईम*